राज्यातील विविध जिल्हयातील पुर परिस्थितीमुळे बाधित झालेल्या नागरिकांना विशेष दराने मदत देण्याबाबत ..

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्रमांक : सीएलएस-२०१९/प्र.क्र.१५७/म-३
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
तारीख: १२ ऑगस्ट, २०१९

<u>संदर्भ:</u> १) शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्रमांक: सीएलएस - २०१२/ प्र.क्र.१५७/ म-३, दिनांक ३०.१.२०१४
२) शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्रमांक: सीएलएस - २०१५/ प्र.क्र.४०/ म-३, दिनांक १३.०५.२०१५
३) शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्रमांक: सीएलएस - २०१७/प्र.क्र.२६७/म-३, दिनांक २५.१.२०१८
४) शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्रमांक: सीएलएस - २०१९/ प्र.क्र.१५७/ म-३, दिनांक ८.८.२०१९
५) शासन पत्र, क्रमांक एससीवाय-०७/२०१९/प्र.क्र.५८/म-११, दिनांक ८.८.२०१९

<u>प्रस्तावना :</u>

राज्यातील विविध जिल्हयातील शहरी व ग्रामीण भागामध्ये दिनांक २६.७.२०१९ रोजी व त्यांनतर झालेल्या अतिवृष्टीमुळे पुराचे पाणी शहरी व ग्रामीण भागामध्ये पसरले. या पुर परिस्थितीमुळे बाधित झालेल्या कुटुंबियांना मदत देण्यासंदर्भात दिनांक ३०.७.२०१९ व दिनांक ७.८.२०१९ रोजी मंत्रिमंडळ बैठकीत झालेल्या निर्णयाप्रमाणे पुर परिस्थितीमुळे बाधित झालेल्या नागरिकांना विशेष दराने मदत देण्याचा निर्णय संदर्भाधीन क्रमांक ४ येथील शासन निर्णयान्वये घेण्यात आला असून त्यासाठी रू १५४ कोटी इतका निधी देखील वितरित करण्यात आला आहे. पुरपरिस्थितीमुळे जनजीवन विस्कळीत झाले असून बँकाचे व्यवहार सुरळीत होण्यास कालावधी लागणार असल्यामुळे बाधित कुटुंबियांना तातडीच्या बाबीसाठी निधी मिळण्यास विलंब होवू नये म्हणून मदतीच्या रकमेतील काही रक्कम रोखीने देण्यास मंजूरी देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय :</u>

संदर्भाधीन क्रमांक ४ येथील शासन निर्णयान्वये दिनांक २६.७.२०१९ रोजी व त्यांनतर राज्यात विविध जिल्हयात निर्माण झालेल्या पुरपरिस्थितीमुळे घरात पाणी शिरल्यामुळे झालेल्या नुकसानीसाठी राज्य आपत्ती प्रतिसाद निधी (SDRF) व राज्य शासनाकडून वाढीव मदत अनुज्ञेय करून मदत देण्यास शासनाची मान्यता देण्यात आली आहे.

२. पुरपरिस्थितीमुळे जनजीवन विस्कळीत झाले असून बँकाचे व्यवहार सुरळीत होण्यास कालावधी लागणार असल्यामुळे बाधित कुटुंबियांना तातडीच्या बाबीसाठी निधी मिळण्यास विलंब होवू नये म्हणून त्यांना दयावयाच्या मदतीच्या रकमेतील रूपये ५,०००/- (रू. पाच हजार फक्त) इतकी रक्कम रोखीने देण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे. रोखीने रक्कम प्रदान करताना मदत अनुज्ञेय असलेल्या कुटुंबालाच व शक्यतो अशा कुटुंबातील जेष्ठ महिला सदस्यांस सदर रक्कम प्रदान करण्याची जिल्हाधिकारी यांनी काटेकोर दक्षता घ्यावी.

उर्वरित रक्कम बाधित कुटुंबियांच्या बँक खात्यात थेट जमा करावी. बाधित कुटुंबियांना देण्यात आलेल्या मदतीच्या रकमेची माहिती जिल्हाधिकारी यांनी त्यांच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी.

३. रोखीने रक्कम प्रदान करण्यासाठी होणारा खर्च राज्य शासनाकडून दयावयाच्या वाढीव मदतीमधील रक्कमेतून करावा व तो प्रधान लेखाशीर्ष २२४५- नैसर्गिक आपत्तीच्या निवारणासाठी अर्थसहाय, ०२ पुर चक्रीवादळे इत्यादी, १०१, अनुग्रह सहाय्य, (९२) राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या मानकाव्यतिरिक्त खर्च, (९२) (०१) रोख भत्ता मृत व्यक्तीच्या कुटुंबियांना सहाय्य व जखमींना मदत, ३१ सहाय्यक अनुदाने (२२४५२१९४) या लेखाशीर्षाखाली भागविण्यात यावा.

४. हे आदेश वित्त विभागाच्या सहमतीने त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक ३२१/व्यय-९/२०१९, दिनांक १२/०८/२०१९ अन्वये निर्गमित करण्यात येत आहेत.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०८१३१३२३५०८६१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Subhash Hanmant
Umaranikar

Digitally signed by Subhash Hanmant Umaranikar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=d5ea2bb9565eeb9b02d583f130371941a03fc5d98df65d3daafe66960a165024, serialNumber=596a24adfcfcd3edb4245812c0eaccecdf4de3ec6a308b42a682a980bca4db38, cn=Subhash Hanmant Umaranikar
Date: 2019.08.13 13:29:32 +05'30'

(सु. ह. उमराणीकर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,मंत्रालय,मुंबई,
२. मा. विरोधी पक्ष नेता (विधानसभा/विधान परिषद), विधानमंडळ सचिवालय,मुंबई,
३. महाराष्ट्र विधानमंडळाचे सर्व सन्माननीय विधान सभा/विधान परिषद सदस्य,
४. अपर मुख्य सचिव (वित्त),मंत्रालय,मुंबई,
५. सर्व विभागीय आयुक्त,
६. सर्व जिल्हाधिकारी,
७. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) १/२, महाराष्ट्र, मुंबई/नागपूर,
८. महालेखापाल (लेखा परिक्षा) १/२,महाराष्ट्र,मुंबई/नागपूर,
९. संचालक, लेखा व कोषागारे ,मुंबई
१०. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
११. वित्तिय सल्लागार व सहसचिव,मदत व पुनर्वसन प्रभाग,मंत्रालय,मुंबई
१२. कार्यासन अधिकारी (म-११/म-३), मदत व पुनर्वसन प्रभाग,मंत्रालय,मुंबई
१३. वित्त विभाग (कार्यासन व्यय-९/अर्थ-६),मंत्रालय,मुंबई
१४. निवड नस्ती (कार्यासन/ म-३).